# Bharatiya Janata Party

C.D.O. Barrack No.1, Opp. Yogekshema, Vasantrao Bhagwat Chowk,
Nariman Point, Mumbai 400 020. Tel: 22022050

भाजप नेते श्री. नितीन गडकरी आणि डॉ. किरीट सोमैया यानी प्रसिद्ध केलेले संयुक्त पत्रक

सप्टेंबर २४, २००७

## "आयात गहू माणसानी खाण्यासाठी योग्य नाही - सरकारी प्रयोगशाळेचा अहवाल"
## २६५ पैकी २२९ नमुने सदोष आढळले

महाराष्ट्र सरकारच्या सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळेने सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत वितरित केला जाणारा गहू **"माणसानी खाण्यासाठी योग्य नाही"** असे जाहीर केले आहे. डॉ. किरीट सोमैया यानी माहिती हक्काच्या अधिनियमाखाली सरकारी प्रयोगशाळेचा अहवाल प्राप्त केला आहे. सरकारी प्रयोगशाळेने स्पष्टपणे म्हटले आहे कि त्याना उपलब्ध करून देण्यात आलेल्या २६५ नमुन्यांपैकी २२९ नमुने १९५५ च्या आरोग्य सेवा अधिनियम/नियम अन्वये गव्हाच्या दर्जाच्या अनुरुप नाहीत. तो माणसानी खाण्याच्या योग्यतेचा नाही. सरकारी प्रयोगशाळेने नमूद केले आहे कि, **"बुरशीच्या वाढीमुळे सर्व गहू दूषित झाला आहे".**

भाजप नेते श्री. नितीन गडकरी आणि डॉ. किरीट सोमैया यानी आज अनुसूचित जमातीना, कामासाठी अन्न आणि अंत्योदय, अनुपमा वगैरे सारख्या दारिद्रय रेषेखालील योजनांसारख्या विविध कल्याण योजनांच्या अधीन असा हीन दर्जाचा गहू वितरित केल्याबद्दल सरकारी अधिकाऱ्यांविरुद्ध फौजदारी कारवाई करण्याची मागणी केली आहे. परदेशात असा गहू गुराना घालण्यासाठी वापरला जातो. सार्वजनिक वितरण व्यवस्थेतून असा हीन दर्जाचा गहू ताबडतोब काढून घेण्याची मागणी भाजपने केली आहे.

भाजपने महाराष्ट्राच्या नागरी पुरवठा मंत्रालयाचा अधिकृत पत्रव्यवहार प्राप्त केला आहे. ही धक्कादायक बाब आहे कि, एप्रिल २००७ या महिन्यात, मुंबई विभागाने सरकारला कळविले होते कि "गव्हाच्या २६५ नमुन्यांपैकी २२९ नमुने पीएफए प्रमाणकांनुसार नसल्यामुळे, वितरण ताबडतोब थांबविण्यात यावे". नागरी पुरवठा मंत्रालयाने मुंबई आणि ठाणे विभागात असा हीन दर्जाच्या आयात गव्हाची विक्री थांबविण्याचा आदेश दिला होता.

तेच सरकार उपरोक्त योजनांखाली त्याच गव्हाची विक्री आणि वितरण गरीब जनतेला करणे चालू ठेवते हे धक्कादायक आहे.

≈≈≈≈≈≈≈≈≈≈≈≈≈≈≈≈≈≈≈≈≈≈≈≈≈

## सीव्हीसी तपास - अन्न मंत्रालयाने सविस्तर अहवाल सादर केला

मुख्य सतर्कता आयोगाने डॉ. किरीट सोमैया यांच्या तक्रार क्र. ८८९-०७-७ दिनांकित २० ऑगस्ट २००७ रोजीच्या तक्रारीवरून चौकशी सुरू केली आहे. मुख्य सतर्कता आयुक्तानी २४ ऑगस्ट रोजी ही तक्रार तपासासाठी मुख्य सतर्कता अधिकाऱ्याकडे पाठवली आहे. सीव्हीओनी ती अन्न मंत्रालयाकडे सविस्तर अहवाल सादर करण्यासाठी आणि तक्रारीत नमूद केलेल्या मुद्द्यांवर स्पष्टीकरण करण्यासाठी पाठवली आहे. असे समजण्यात आले आहे कि मंत्रालयाने आपला अहवाल सीव्हीसीकडे सादर केला आहे आणि त्याचा सध्या अभ्यास चालू आहे. सविस्तर अभ्यासानंतर, मुख्य सतर्कता अधिकारी त्यांचा अहवाल आणि शिफारशी मुख्य सतर्कता आयुक्ताना सादर करतील.

**डॉ. किरीट सोमैया शुक्रवार दिनांक २८ सप्टेंबर रोजी दिल्ली येथे सीव्हीसीना अधिक पुरावे सादर करणार आहेत.**

*-प्रसिद्धी साचिव*